INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# मराठी आदिवासी कादंबऱ्यातील सामाजिकता

## (Sociality in Marathi Tribal Novels)

**हर्षल गेडाम**
संशोधक विद्यार्थी,
सशोधन केंद्र,
तायवाडे कॉलेज, कोराडी, नागपूर

**डॉ. कोमल ठाकरे**
मार्गदर्शक
सशोधन केंद्र,
तायवाडे कॉलेज, कोराडी, नागपूर

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/09.2023-76196726/IRJHIS2309010

**गोषवारा:**

*मराठी आदिवासी कादंबरीचा विचार करताना आदिवासी कादंबरीचा प्रवाह हा आदिवासीऐत्तर आणि आदिवासी लेखकांनी समृद्ध केलेला आहे. हे आपल्या लक्षात येते, मराठी आदिवासी कादंबऱ्यांची सुरुवात ही रवा दिघे यांच्या कादंबरी पासून झाली आदिवासींच्या सामाजिक समस्यांचे दिग्दर्शन करीत त्यांना वास्तवदर्शी दिशा दाखवण्याचे कार्य आदिवासीऐत्तर समाजातील लेखकांनी केलेले आहे. यामध्ये गो.नी. दांडेकर, यांची 'जैत रे जैत', र.वा. दिघे यांची, 'सोनकी', अनिल बर्वे यांची 'डोंगर म्हातारा झाला', मधुकर वाकोडे 'झेलझपाट', दीनानाथ मनोहर 'ऐका नक्षलवाद्याचा जन्म', सुरेश द्वादेशीवार 'हाकुमी', विलास मनोहर 'आंदोलन',एकनाथ साळवे 'एन्काऊंटर', बाबा भांड 'तंट्या', कविता महाजन 'ब्र', गो. ना. मूनघाटे 'माझी काटेमुंढरी शाळा' यांच्यपाठोपाठ स्वातंत्र्योत्तर काळात काहीसा उशिरा म्हणजे 1990 नंतरच्या कालखंडात आदिवासी समाज समूहांमधून शिक्षणाच्या प्रक्रियेमधून बाहेर पडलेला सुजाण शिक्षित वर्गाने आपल्या समाज समूहांच्या व्यथा वेदना पहिल्यांदास्वतःच्या लेखणीतून मांडण्यास सुरुवात केल्याचे आपणास दिसते नव्वदच्या दशकात आदिवासी कादंबरीकारांचे लेखन पुढे येऊ लागले यासाठी 1995 हे साल उजाडावे लागले. 1995 मध्ये नजूबाई गावित यांची 'तृष्णा',ही आत्मवृत्तपर कादंबरी प्रकाशित झाली. त्यानंतर 2014 मध्ये रामराजे आत्राम यांची 'प्रतिष्ठा' ही कादंबरी प्रकाशित झाली.या व्यतिरिक्त आदिवासी जमाती मधून आलेल्या चार-पाच लेखकांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.*

**सूचक शब्द:** *आदिवासी,कादंबरी,विषम,सामाजिक,अन्याय,पिळवणूक,शोषण*

**प्रस्तावना :**

साहित्यकृतीच्या आशयात सामाजिकता येतच असते. सामाजिकता उथळ स्वरूपाची न राहता जीवन वास्तवातील अंतर्गत बाबींचा वेध घेणारी असावी.ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव साहित्यातील सामाजिक आशया बद्दल म्हणतात की "साहित्यातील सामाजिक आशयाचे जे बलस्थान आहे,तेच त्याचे दुबळेपणही आहे. समाज हा साहित्याचा महत्त्वाचा व न संपणारा विषय आहे. हे खरे; पण खुद्द समाजाचा महत्त्वाचा व न संपणारा विषय केवळ समाज नाही, हे दुर्दैवानेखरे आहे. कोणत्याही 'मी' चे सार्थक केवळ 'मी' पणात नसते. समाजाचे सार्थक केवळ समाजात नाही. सामाजिक आशयाचे साफल्य केवळ त्या आशयात नाही. माणसाचे संपूर्ण समाधान व संपूर्ण दर्शन सामाजिक आशयातून प्राप्त होत नाही. निव्वळ सामाजिक आशयाचे साहित्य श्रेष्ठ ठरू शकत नाही; कारण ज्या कशाला तरी माणूस श्रेष्ठ मानतो, ते काहीतरी केवळ सामाजिक असत नाही. ते अधिक काहीतरी असते. माणसाच्या अंतरात्म्याची ओढ केवळ

समाजापेक्षवास्तवापूर्ती व आदर्शापुरती मर्यादित नसते; ती त्याहूनही काहीतरी उच्च व उदात्त असे श्रेयस शोधित असते. सामाजिक जाणीवांना, म्हणूनच, स्वतःचे स्वत्व न गमावता त्या श्रेयसचा प्रत्यय साहित्यातून घडवता आला, तर तो सामाजिक आशय अक्षर ठरू शकेल."[१] हे साहित्यकृतीच्या आशयाच्या सामाजिकते बद्दलचे जाधव यांचे मत एकंदरीत साहित्यकृती मधील आशयाच्या सामाजिक तेचे महत्त्व पटवून देणारे आहे.

आदिवासी जमातींचे जीवनचित्रण,त्यांच्या समस्या,प्रथा-परंपरा यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने सर्वप्रथमकादंबरी लेखनाचा प्रयत्न र.वा दिघे यांनी केला आहे.त्यानंतर स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी जीवनावर आधारित अनेक कादंबऱ्यांचे लेखन झाल्याचे आपणास दिसते. यातील अनेक कादंबरीकार या कादंबऱ्यांचे लेखन करण्यासाठीप्रत्यक्ष आदिवासी जमातींमध्ये जाऊन राहिलेले आहे. आणि त्यांचा आदिवासी जीवनाशी प्रत्यक्ष संबंध आलाआहे. आदिवासींचे जीवन त्यांनी जवळून अनुभवले आहे आणि त्यातूनच आदिवासी कादंबरीचे कथाबीज जन्माला आल्याचे आपणास दिसते आहे. या लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांमधून प्रस्थापित साहित्य व्यवहारांमध्ये रूढ असलेल्या जीवनवादी, कलावादी, पांढरपेशीयभाव संवेदनांना फाटा देत आदिवासींचे संघर्षमयवेदनामय जीवन,त्यांचे दैन्य,दारिद्र्य, दुःख, अभावग्रस्ततायांनी बरटलेले जीवन चित्रण मराठी कादंबरीमध्ये पहिल्यांदा मांडल्याचे आपणास दिसते या संदर्भात 'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीचे लेखक श्री.गो. ना.मुनघाटे हेआपल्या कादंबरीच्या मनोगतात सांगतात की "आयुष्यातील दोन दशके मी गडचिरोली जिल्ह्यातील ज्या दुर्गम आदिवासी खेड्यात शिक्षण सेवा करण्यातघालविले, तेथील घनदाट जंगल, नद्या-नाले, पक्षी-प्राणी,माडियागोंड आदिवासी, त्यांची निरक्षरता आणि त्यांची आगळीवेगळी संस्कृती मला स्वस्त बसू देतनव्हती. त्यावर काही लिहावे अशी माझ्या अंतर्मनाची प्रेरणा होती."[२] अशा प्रकारची भूमिका त्यांनी लेखनाविषयी मांडलीयावरून मराठी आदिवासी कादंबरीच्या आशयाची सामाजिकता किती व्यापक स्वरूपाची आहे हे लक्षात येते.मराठी आदिवासी कादंबरीचा आशय हा व्यक्तिवादी,कलावादी, रंजनवादीदृष्टिकोन न बाळगता समाजवास्तव घेऊनच प्रकट होताना दिसतो. आशयतत्व हा मराठी आदिवासी कादंबरीचा आत्मा आहे. यातच मराठी आदिवासी कादंबरीचे सर्व सामर्थ्य एकवटलेले आहे.

गो.नी. दांडेकरांची 'जैत रे जैत'ही पहिली कादंबरी आहे.ही कादंबरी लिंगोबाच्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या ठाकरवाडीतील नाग्या आणि चिंधी या नायक – नायिकेभोवती फिरणारी आहे.देव भोळा नाग्या आणि ठाकरवाडीतील अंधश्रद्धे मध्ये गुरफटलेले ठाकर आणि मधमाशांच्या हल्ल्यात डोळा फुटून गंभीर जखमी झालेला नाग्याया कादंबरीत आपल्याला दिसतो. मधमाशांचा बदला घेण्यासाठी नाग्या त्यांची पोळी उध्वस्त करून राणी माशीचा बदला घेण्याचा निश्चय करतो. दुसरीकडे नवरा पसंत नसल्यामुळे नवऱ्याला काडीमोड देण्यासाठी काबाडकष्ट करणारी चिंधी सारखी नायिका पंचायत बोलावून नवऱ्याला काडीमोड देणारी आणि पंचायतीमध्ये न्यायनिवाड्याच्या नावाखाली होणारे गरीब व्यक्तींचे शोषण सुद्धा आपणास प्रत्ययास येते. राणीमाशीचा बदला घेण्याचा आपला निश्चय तो ठाकरवाडीत बोलून दाखवतो, तेव्हा इतर वेळी सर्व कामे सामूहिकपणे करणारे ठाकर त्याला साथ देण्यास नकार देतात. तरी न डगमगता नाग्या कधी कुणीही सर न केलेला लिंगोबाचा डोंगर चढून जातो आणि या बदल्याच्या भावनेने पछाडलेला नाग्या मधमाशांची पोळी उध्वस्त करतो. परंतु यावेळी डोंगराच्या खाली बसलेल्या चिंधीवर हल्ला करतात आणि त्यात चिंधी गंभीर जखमी होते एकंदरीत या कादंबरीत अंधश्रद्धेमध्ये गुरफटलेल्या ठाकर जमातीच्या सामाजिकतेचा प्रत्यय येतो. पापभीरू असणारा नाग्याराणी माशीचा बदला घेण्यासाठी आपल्या सर्व श्रद्धा सोडून देताना दिसतो. या कादंबरीतून ठाकरांच्या सामाजिक जीवनाचे विविध पैलू मराठी वाचकांसमोर आणले आहेत.

र.वा. दिघे, यांच्या 'सोनकी' या कादंबरी मधून देखील आशयाच्या सामाजिकतेचा प्रत्यय आपल्याला येतो. सोनकी या कादंबरीमध्ये ठाकर जमाती मधील सामाजिक एकता कशा प्रकारची आहे.मुंबईचा चित्रकार चित्रसेन चित्रे याच्याशी असलेल्या प्रेम संबंधातून विवाहपूर्वी गर्भवती राहिलेली सोनकी, ही नायिका उघड्या ठाकरच्या धाकापोटी आंधळ्या कमळयाशी लग्न करते आणि लग्नानंतर सुद्धा ती चित्रसेनाच्या मुलाला जन्म देते जेव्हा जात पंचायतीमध्ये तिला मुलाच्या बापाबद्दल विचारल्या जाते. तेव्हा ती न डगमगता खऱ्यापणाने चित्रसेनाचे नाव घेते. अशाप्रकारे अगदी दंडाची किंवा शिक्षेची भीती असताना सुद्धा सोनकी अगदी खरे बोलताना दिसते. ठाकरांच्या जातीव्यवस्थेचे आणि त्यांच्यातील सहकार्य याचे उत्तम रेखाटन र.वा. दिघे यांनी या कादंबरी मधून केले आहे.सोनकीच्याबाळंतपणानंतर अशक्तपणामुळेतिला दूध येत नसल्याने, बाळाचे संगोपन नीटपणे करता येत नव्हते. जेव्हा तातोबा प्रधान आणि वत्सलाबाई सोनकी ला बघायला जातात तेव्हा सोनकीचा अशक्तपणा आणि तिचे हाल पाहून ते जीविताबद्दल काळजी व्यक्त करतात त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या ठाकरणी म्हणतात की"ती मस्तमारील.पनजित्या जीवाला आम्ही बरं मारून देऊ. अंगावरच्या दुधाच्या आम्ही समद्या पोरवाल्या बाया फैलात उभ्या राहतो आन चुटका चुटका चुटकावतो."[३] अशा प्रकारच्या ठाकरांमधील सामाजिक सहकार्याचा प्रत्यय या कादंबरी मधून आपल्याला दिघ्यांनीआणूनदिला आहे. एकंदरीत सर्वच आदिवासी जमातींमध्ये अशा प्रकारची सामाजिक एकता आणि सहकार्याची भावना दिसून येते. याचा प्रत्यय आपल्याला याआदिवासी साहित्यकृती मधून अनेक ठिकाणीयेताना दिसतो.

'डोंगर म्हातारा झाला'ही अनिल बर्वे यांची कादंबरी देखील आशयाच्या सामाजिकतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्णआणि वैविध्यपूर्ण आहे. या कादंबरीत देखील आशयाच्या सामाजिकतेचे अनेक पैलू प्रकटलेआहेत.मुंबईतील यंत्रवत चालणाऱ्या दगदगीच्या जीवनाला कंटाळलेला बंबैय्या बाबू असणारा मेजर कामा मुंबईतील कटकटी पासून सुखाने आपले आयुष्याचे उरलेले दिवस घालवण्यासाठी मळकर्णी नावाच्या छोट्या हिल स्टेशन वजा गावामध्ये घालविण्यासाठी येतो.परंतु या ठिकाणी त्याची भेट हाडाचा कॉम्रेड असणाऱ्या कमराद म्हाताऱ्याशीहोते आणि हळूहळू मेजर कामादेखील आपली लष्करी शिस्त आणि लष्करी पेशा बाजूला ठेवत इथल्या समाज जीवनाशीएकरूप होताना आपल्याला या कादंबरीतून दिसतो कादंबरीतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे आदिवासी ठाकर आणि आदिवासी ऐत्तर इतर लोक म्हणजे चरत्तूशेठ अडवाणी, मगनशेठ आणि पोलीस अधिकारी यांच्यातील संघर्षाचा भाग देखील महत्वाचा आहे. अनिल बर्वे यांनी या संघर्षामध्ये दुय्यमनायकाच्या मध्यवर्ती भूमिकेमध्ये मेजर कामा ला उभे केले आहे. एकलकोंड्या आणि कुणाशी काही देणंघेणं नसणारा, सुरुवातीला निवांत मासेमारी करणेआणि शिकार करणे हा बेत आखून मळकर्णीच स्थायिक होऊ पाहणारा मेजर कामा हा तेथील लोक जीवनाशी समरस झालेला आपणाला अनेक ठिकाणी दिसून येतो. "यु सी कामा दॅटभॅंचोद फॉरेस्ट ऑफिसर... काल साला दोन कोंबड्या घेऊन गेला.एकच उरली होती. तुझ्यासाठी कापली, खुशीने कापली. माझी ठाकरं जंगली आहेत. पण कल्चर्ड आहेत, त्यांची याद ठेव."[४] मळकर्णीतल्या ठाकरांची परिस्थिती ही अतिशय दयनीय आहे. दोन वेळच्या अन्नासाठी देखील त्यांना राना-वनात फिरावे लागते. रत्तूशेठ आणि मगनशेठच्या वनसेवा आश्रमात ढोर मेहनत करून देखील मजुरीच्या नावाने मिळणाऱ्या रकमेतून दोन वेळच्या जेवणाची सोय देखील ठाकर करू शकत नाही. असे असताना सुद्धा शिकारीच्या निमित्ताने कमराद म्हाताऱ्यासोबत ठाकर वाड्यात आलेल्या मेजर कामाचं आदरातिथ्य करण्यास ठाकर कुठलीही कसर ठेवत नाही. अशा प्रकारचा सामाजिक आशय या कादंबरीत अनेक ठिकाणी आलेला आहे. एकंदरीत या सामाजिक आशयमुळेही छोटेखाणी कादंबरी देखील आदिवासी कादंबरीच्या प्रवाहातील एक महत्त्वपूर्णकादंबरी ठरली आहे.

'झेलझपाट' ही मधुकरवाकोडे यांची एक अतिशय महत्वाची कादंबरी आहे. विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट

परिसरातील कोरकू आदिवासी जमातीला केंद्रस्थानी ठेवूनमधुकरवाकोडे यांनी याकादंबरीचे लेखन केले आहे. या कादंबरीचा मुख्य विषय केरू आणि फुलय या कोरकू प्रेमी युगलांची हळूवार फुलणारी प्रेमकथा असली तरी कादंबरीकार मधुकर वाकोडे यांनीकोरकूंच्या इतरही महत्त्वाच्या विषयांवर प्रकाश टाकल्याचे आपणास दिसते. या कादंबरीच्या माध्यमातून वाकोडे यांनी कोरकूंच्या सामाजिक जीवनाचे विविधांगी पैलू पहिल्यांदा या कादंबरीच्या माध्यमातून मराठी वाचकांसमोर मांडले आहेतया कादंबरीचा नायक केरू हा मॅट्रिक नापास असलेला गावातील कोरकू जमाती मधील सर्वात जास्त शिकलेला तरुण आहे. इतरत्र मजुरी करण्यापेक्षा त्याला मासेमारी करण्यामध्ये जास्त रस असल्याचे दिसते. कोरकू जमातीतील गावातील एकमेव सुशिक्षित असल्याने केरूला आपल्या जमातीवर होणाऱ्या अन्यायाची बरीच जाणीव झालेली दिसते.त्याविरुद्ध तो वेळोवेळी विरोध करण्याचा प्रयत्न देखील करतो. सोसायटीमध्ये होळीसाठी कोरकू स्त्रियांना वाटण्यासाठी आलेले लुगडी जेव्हा सोसायटीचा कर्मचारी वुईके साहेब रहीम शेठला परस्पर विकतो. तेव्हा केरू सोसायटीमध्ये जाऊन रहीम शेठ आणि वुईके साहेबाला जाब विचारतो तर दुसऱ्या प्रसंगातबुडा हिराजी सोबत रहीम शेठ कर्जाबद्दल वाद घालत असतो तेव्हा के मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतो आणि रहीमशेठला हिराजीच्या कर्जाची डायरी दाखवण्यास सांगतो आणि हिराजीचे कर्ज किती आहे हे बघण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न करतो परंतु डायरी उर्दूमध्ये असल्याने त्याला ते वाचता येतनाही. शासन, प्रशासन व व्यापारी वर्ग यांच्याकडून कोरकूंचे अतोनात शोषण होतं होताना दिसते याकादंबरीतून सामाजिकअन्यायाविरुद्ध लढा देऊन पाहण्याचा प्रयत्न करणारा केरू सारखा एकमेव नायक वाकोडे यांनी चित्रित केला आहे. कोरकुंचे सणवार, उत्सव, नाच, तंत्र-मंत्र आदी बारीक-सारीक सामाजिक तपशील देखील या कादंबरीत आलेले आहेत सामाजिकतेच्या दृष्टीने ही कादंबरी अतिशय महत्त्वाची आहे.

'आंदोलन' ही दीनानाथ मनोहर यांची कादंबरी आशयाच्या सामाजिकतेच्या दृष्टीने देखील अतिशय महत्त्वाची कादंबरी आहे या कादंबरीतून दिनानाथ मनोहर यांनी धुळे जिल्ह्यातील भिल्ल आदिवासींच्या पहाडपट्टीतील संघर्षमयजीवनाचे चित्र मांडले आहे. 1970 च्या दशकात धुळ्याच्या पहाडपट्टीतील आदिवासींना कशा प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते याचे प्रत्यंतरया कादंबरीतून आपणास येते. तापीच्या खोऱ्यातील अडाणी भिल्लांची शासकीय यंत्रणांकडून कशा प्रकारे फसवणूक होत होती आणि त्या फसवणुकीच्या विरोधात रघुनाथ सावंत यांच्या नेतृत्वाखाली जे श्रमिक संघटनेने लढा उभारला होतात्या लढ्याचे दर्शन या कादंबरीतून दिनानाथ मनोहर यांनी घडविले आहे. शहाद्याच्या बी अँड सी च्या डेप्युटी इंजिनियर रंगनाथ रंराव पाटील हा गरीब भिल्लांना रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या खडी फोडण्याच्या कामाची अर्धीच मजुरी देऊन फसवणूक करतो आणि या भ्रष्टाचारामध्ये दोन ते तीन लाख सरकारी रकमेचा घोटाळाकरूनभिल्लांच्याहक्काचीरक्कमस्वतहडपून बसतो. ही बाब रघुनाथ सावंत या श्रमिक संघटनेच्या कार्यकर्त्याच्या लक्षात येतात त्यांनी पहाडपट्टीतील अंदाजे हजार श्रमिक आदिवासींना एकत्र करून, त्यांच्या हक्काची मजुरी मिळवून देण्यासाठी डेप्युटी इंजिनिअरच्या कार्यालयालाघेराव घालण्याचे घेराव घालून आंदोलन उभारण्याचे ठरवतो. शहादा शहरांमध्ये भिल्लांचा जमाव डेप्युटी इंजिनिअर पाटीलच्या कार्यालयावर मोर्चा घेऊन येत असल्याचे कळताच इंजिनीयर पाटील तेथून पसार होतो. परंतु पाटील पसार झाल्यानंतर देखील श्रमिक संघटनेचे दोनशे तीनशे कार्यकर्ते पाटीलच्या कार्यालयाला घेराव घालतात. त्यावेळी कार्यालयातील बहुतांश कर्मचारी पसार होतात. परंतु अरुण कर्डक, कुलकर्णी आणि रफिक ट्रेसर हे तीन कर्मचारी आंदोलकांच्या तावडीत सापडतात ज्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या हक्काचा पैसा लुबाडला त्या विभागाच्या या तीन कर्मचाऱ्यांबद्दल मात्र श्रमिक आदिवासींच्या मनात कुठल्याही प्रकारचा आकस दिसत नाही. उलट शेवटपर्यंत या संघटनेचे कार्यकर्ते या तीनही कर्मचाऱ्यांना अतिशय चांगल्या प्रकारची वागणूक देताना दिसून येतात.या कादंबरीमध्ये आशयाच्या सामाजिकतेचा प्रत्यय आपल्याला अनेक ठिकाणी येतो . श्रमिक आणि त्यांच्या विरोधी असलेल्या शासकीय

यंत्रणेचे कर्मचारी यांच्यातील आपसी सहकार्याचा सामाजिक अनुबंध देखील या कादंबरीमध्ये अनेक ठिकाणी आलेला आपणास दिसतो.

'हाकुमी' सुरेश द्वादशीवार यांची 1989 मध्ये प्रसिद्ध झालेली कादंबरी ही कादंबरी महाराष्ट्राच्या अति पूर्वेला असलेल्या शेवटच्या टोकावरील भामरागड परिसरातील माडिया आदिवासींच्या जीवनावर आणि कन्ना नावाच्या खऱ्याखुऱ्या नायकाच्या जीवनावर आधारित असलेली कादंबरी आहे. या कादंबरीतून मराठी साहित्य मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडील माडिया जमातीचे चित्र आणि त्यांचे भीषण जीवन वास्तव पांढरपेशीय मराठी वाचकांसमोर आलेले आहे कादंबरीचीसुरुवात कन्ना च्या वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशापासून झालेली दिसते.माडिया जमातीमध्ये परिवर्तन घडवू पाहणारा कन्ना हा सामाजिक परिवर्तनाच्या ध्यासाने पछाडलेला एक ध्येयवादी तरुण आहे. अगदी डॉक्टर होण्यापूर्वीपासून त्यांना आपल्या जमातीमध्ये सुधारणा घडवून पाहत आहे.मग तो आपल्या जमातीच्या शेकडो वर्षापासून चालत आलेल्या चुकीच्या प्रथापरंपरां मोडीत काढण्यासाठी त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आपल्या समाजाच्या घरच्यांचा विरोध पत्करतो पवरी लग्नानंतर तल्लोईच्याकोपाचीपरवा न करता तल्लोईचा दंडक मोडायचा प्रयत्न करतो आणि आणि गावातील विवाहित तरुणींची लग्नानंतर उघड्या अंगाने म्हणजेच विना झंपर वावरण्याची प्रथा गावातील जेष्ठांचा विरोध मोडून तो मोडीत काढतो. तर पुण्याहून डॉक्टर होऊनगावात आल्यावर पेरमलीच्या पेरमाच्या सांगण्यावरून वड्डे कुटुंबातील बालकाचा बळी देण्याचे नरबळी देण्याचा प्रयत्न तो हाणून पाडतो. अशा प्रकारे समाजामध्ये अनेक सुधारणा घडवून पाहणारा हा नायक सुरेश द्वादशीवार यांनी रेखाटला आहे. एकंदरीत आशयाच्या सामाजिकतेच्या दृष्टिकोनातून हे कादंबरी अतिशय महत्त्वाची आहे

'एका नक्षलवाद्याचा जन्म'ही विलास मनोहर यांची आदिवासी जीवनावरील एक अतिशय महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीतीलकालखंड हा 1980-90 च्या दशकातील आहे महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावरील भामरागड च्या भागातील माडीया आदिवासींच्या जीवनावर ही कादंबरी आधारित आहे. एकंदरीत महाराष्ट्रातील नक्षल चळवळीची कारणमीमांसा करणारी महत्त्वाची कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख केला जातो.साधारणता 1980 च्या दशकात महाराष्ट्रात नक्षली चळवळ कशाप्रकारे फोफावतगेली आणि त्याचा आदिवासींच्या जीवनावर कशाप्रकारे परिणाम झाला. याची कारणमीमांसाया कादंबरीतून केली आहे मनोहरांची ही कादंबरी आदिवासींच्या शोषणाचा व नक्षलवादयांच्या उगमाचा पट दर्शविणारी कादंबरी आहे. सामान्य आदिवासी ते नक्षलवादी असा आदिवासीचा प्रवास या कादंबरीतूनदाखविला आहे. आदिवासी समाज शासकीय यंत्रणेकडून होणाऱ्या अन्यायाला कंटाळला होता. या शोषणाला व आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करण्याची ताकद, या निरक्षर आदिवासीमध्ये कधीच नव्हती. परंतु या भागातील नक्षलवादयाच्या प्रवेशामुळे आदिवासीच्या शोषणाचे प्रमाण काही अंशी कमी झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे या कादंबरीचा नायक जुरुसारख्या सरळमार्गी गृहस्थाच्या मनात नक्षलवादी चळवळीच्या विषयी सहानुभुतीनिर्माण होते.

या कादंबरीतूनश्री विलास मनोहर यांनी आदिवासींच्या जीवनात नक्षली चळवळीचा शिरकाव कशाप्रकारे झाला आहे हे अतिशय उत्तम प्रकारे दाखवले आहे त्याचबरोबर आदिवासींच्या सामाजिक जीवनाचे विविध पैलू सुद्धा त्यांनी या कादंबरीतून अतिशयसमर्थपणे रेखाटले आहे आदिवासींचे सण उत्सव विवाह पद्धती त्यांच्या श्रद्धा अंधश्रद्धा मुलींसाठी घर जावई म्हणजेच लमाने आणण्याची प्रथा अणि गावावर आलेल्या संकटांची एकजुटीने मुकाबला करण्याची त्यांची सामूहिक वृत्ती आधी विविध सामाजिक घटकांचा देखीलअतिशय चपकल्पने वापर लेखकांनी या कादंबरीत केलेला आपल्याला दिसून येतो आशयाच्या सामाजिकतेच्या दृष्टीने ही कादंबरी मराठी आदिवासी कादंबरीमध्ये अतिशय महत्त्वाची कादंबरी आहे.

एनकाऊंटर ही कादंबरी सन 1998 मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीचे लेखक ॲड. एकनाथ साळवे हे चंद्रपूरातील एक

ख्यातनाम विधिज्ञ होते. तसेच सन 1967 ते 1978 या काळात ते चंद्रपूर विधानसभा मतदार संघातुन आमदार देखील होते अॅड. साळवे यांनी अनेक खटल्यामध्ये त्यांनी नक्षलवादाच्या नावाखाली पोलिसी अत्याचारग्रस्त व वनकायदयाने पिडीत आदिवासीची कायदेशीर बाजू देखील मांडली आहे आणि विदर्भातील बहुजन चळवळीतील एक जेष्ठ मार्गदर्शक म्हणून देखील कार्यरत होते त्यामुळे त्यांचा गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाजजीवनाशी अतिशय जवळून संबंध आला आहे फक्त 138 पृष्ठांची ही लघु कादंबरी मराठी आदिवासी कादंबरीच्या प्रवाहातील एक अतिशय महत्त्वाची कादंबरी ठरली आहे ही कादंबरी नक्षलवादी चळवळ आणि पॉलिसी व्यवस्था यांच्यामध्ये भरडल्या जाणाऱ्या निष्पाप आदिवासी जीवांचे मुकआक्रंदनआहेअसेम्हटल्यासअतिशयोक्ती ठरणार नाही. नक्षलवाद आणि पोलिस यांच्यातील संघर्षात भरडल्या जाणारे आदिवासी याचे अतिशय वास्तवदर्शी चित्रण या कादंबरीतून पुरेपूर प्रत्ययास येतेया दोन्ही बाजुने लढणारे हे बहुतांश आदिवासी आहेत हे या व्यवस्थेचे दुर्दैव आहे की आदिवासीचे? हा एक अनुत्तरीत प्रश्न या कादंबरीतून वाचकांपुढे निर्माण होतो. सामाजिकतेच्या दृष्टीने ही कादंबरी अतिशय महत्त्वाची आहे.

तृष्णा ही कॉ. नजुबाई गाविते यांची सन १९९५ मध्ये प्रकाशित झालेली आत्मवृत्तपर कादंबरी होय नजुबाई गावित या आदिवासी समाजातील पहिल्या महिला कादंबरीकार होत. या कादबरीतून धुळे-नंदूरबार पट्ट्यातील मावची आणि भिल्ल या आदिवासी जमातीच्या जीवनवास्तवाचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. तृष्णा ही कादंबरी आदोर, रोप, रोपणी आणि पारोळी अशा चार भागात विभागली आहे. नजूबाईनी आपल्या जीवनातील अनुभव चार भागात मांडलेआहेत. या कादंबरीतील 'आशा' ची आई 'इसरी' ही प्रमुख नायिका आहे. तृष्णा ही कादंबरी शेवटपर्यंत 'इसरी' या व्यक्तिरेखेभोवती केंद्रित झालेली आहे. 'इसरी' ही नजुबाई गावीत यांची आई असावी. त्यामुळेच तृष्णा ही कादंबरी नजूबाई गावीत यांनी इसरीला अर्पण केली आहेतृष्णा या कादंबरीमध्ये आदिवासी स्त्रियांचे जीवन हे प्राचीन कालखंडापासूनतर आज पर्यंत कशा प्रकारच्या स्थित्यंतरामधून जात आहे हे अतिशय चपखलपने नजुबाई गावित यांनी आपल्या लेखनातून दाखवून दिले आहे

तृष्णा या चार खंडात विभागलेल्या कादंबरीत असख्य पात्रे येतात आणि जातात. मात्र या कादंबरीचा केंद्र बिंदु इसरीआणि आशाच आहेत. आदिवासी जमातीमधील अंतर्गत जमातवाद अतिशय सुक्ष्मपणे या कादंबरीत रेखाटला आहे. वनअधिकारी व महसुल अधिकाऱ्यांकडून आदिवासीचे शोषण, आरोग्याच्या सोई अभावी होणारी आदिवासी परवड, दुष्काळ व नापिकी यामुळे भेडसावणारे उपजीविकेचे प्रश्न, व्यसनाधीनता व त्यामुळे दारु गाळून विकणारे आदिवासी व त्यांचे शोषण करणारे पोलिस तसेच आदिवासीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन लुटणारे वाणी, दुकानदार यासोबतच जमातीमधील पंचायतव्यवस्था असे अनेक विषय नजुबाई गावीत यांनी आपल्या कादंबरीतुनअतिशय ताकदीने मांडण्याचा प्रयत्न या कादंबरीतुन केला आहे. तृष्णामधील आशा ही नायिका आदिवासीमधील शिक्षणविषयक चळवळीची प्रतिनिधी आहे. शेठ – सावकार यांच्याकडुन होणारी आदिवासीची आर्थिक लूट थांबावी या उद्देशाने इसरी कुवत नसतांना देखील शिकविण्याचा प्रयत्न करते. परंतु शाहू मास्तर सारख्या स्त्री लंपटामुळेआशाचे शिक्षण अर्ध्यावरच बंद पडते. यातुन अप्रत्यक्षपणे आदिवासी मुलींच्या शिक्षणाच्या होणाऱ्या परवडीचे संसुचनझाले आहे. भिल्ल व मावची आदिवासी समाजीवनाचे अनेक पैलू आपणास या कादंबरीतुनपहायला मिळतात.

'ब्र' कविता महाजन यांची यांची अतिशय गाजलेली आणि वैविध्यपूर्ण ठरलेली अशी कादंबरी आहेही कादंबरी 2005 साली प्रकाशित झाली.मराठी आदिवासी साहित्याच्या प्रवाहामध्ये ही अतिशय आगळीवेगळी ठरणारी कादंबरी आहे. समाजातील विविध अंगांना स्पर्श करणारी कादंबरी आहे. एकंदरीत कविता महाजन यांचे वरील लेखन हे समाजातील विविध अंगांना केंद्रवर्ती मानून झालेले असल्याचे

आपणास त्यांच्या कादंबरी लेखनावरून 'ब्र', 'भिन्न' या कादंबऱ्या अभ्यासल्यावर असे लक्षात येते ही एक नायिका प्रधान कादंबरी आहे. या कादंबरीतून महाजन यांनी प्रफुल्ला नायिकेला केला केंद्रवर्ती ठिकाणी ठेवून महाराष्ट्रातील विविध कानाकोपऱ्यामध्ये विखुरलेल्या गोंड, वारली, कोकणा, ठाकर, महादेव कोळी, कातकरी, कोलाम, परधान यासारख्या जमातीमधील महिलांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभागाच्या अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागतील आदिवासी जमाती मधील स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक प्रश्नांचा एक जिवंत आलेख 'ब्र' या कादंबरीच्या माध्यमातून कविता महाजन यांनी वाचकांसमोर अतिशय संयमित आणि सुटसुटीत पणे मांडला आहे अशा प्रकारच्या आदिवासी जीवनदर्शनाचा हा मराठी साहित्यामधील एक आगळावेगळा प्रयत्न पहिल्यांदाच कादंबरीकार कविता महाजन यांनी केला आहे स्त्रिया ह्या कुठल्याही समाजातील असो, त्या कुठल्याही वर्गातील असो, कुठल्याही वर्णातील असो, उच्च वर्णीय, असो दलित असो, आदिवासी असो अशा कुठल्याही प्रवर्गातील वर्गातील असो जवळपास सर्वच वर्गातील वर्णातील स्त्रियांना समाजामध्ये वावरताना विविध अंगी समस्यांना तोंड द्यावे लागते त्याला आदिवासी स्त्रिया देखील अपवाद नाहीत किंबहुना इतर वर्गातील वर्णन वर्णातील स्त्रियांपेक्षा आदिवासी स्त्रियांची परिस्थिती ही काही बाबतीत अतिशय हलाखीची असल्याची दिसते. 'ब्र' या कादंबरी मधील येणाऱ्या आदिवासी जमातींमधील विविध विविध स्त्रियांचा राजकीय जीवनपट प्रफुल्ला या नायिकेच्या अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून लेखिका कविता महाजन यांनी वाचकांसमोर मांडला आहे उच्चशिक्षित प्रफुल्ला असो किंवा राज्याच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या विविध आदिवासी जमातींमध्ये अडाणी निरक्षर दरिद्री गरिबीने पीचलेल्या जयाबाई, जिजाबाई, बुधीबाई, शेवलीबाई, मुकणेबाई, राधाबाई, तारुबाई, शेवूबाई यासारख्या आदिवासी स्त्रिया असो यांच्या यातना, समस्या, दु:ख हे थोड्याफार फरकाने का होईना जवळपास सारखेच आहे.

सामाजिकतेच्या दृष्टिकोनातून या कादंबरीचा विचार करताना असे लक्षात येते की, राजकीय क्षेत्रातील आदिवासी महिलांना त्यांच्या हक्कांपासून डावलण्यासाठी बरेचदा वेगवेगळे आमिषे दाखवण्यात येते या कादंबरी मधून प्रफुल्लाने या अभ्यास दौऱ्यांमध्ये ज्या आदिवासी जमातींमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्य असलेल्या किंवा सदस्य होऊन गेलेल्या महिलांची जी काही गाठभेट घेतली आणि त्यांचे सर्वेक्षण करून माहिती गोळा केली. त्या माहितीच्या द्वारे असे लक्षात येते की राजकीय प्रवाहामध्ये सामील होऊ पाहणाऱ्या आदिवासी स्त्रियांसमोर अनेक मोठमोठी आव्हाने आणि संकटांची मालिका अव्यहतपणे सुरू असल्याचेआपल्याला दिसते आहे. इतर समाजातील स्त्रियांप्रमाणे आदिवासी स्त्रिया हे देखील केवळ उपभोगाची वस्तू आहे त्यांना कुठल्याही प्रकारचा अधिकार नाहीअशा प्रकारची धारणा ही इथल्या समाज व्यवस्थेची किंबहुना आदिवासी समाज व्यवस्थेची देखील असल्याचे ब्र या कादंबरीतून आपल्याला प्रकर्षाने जाणवते. या कादंबरीच्या माध्यमातूनकविता महाजन यांनी आदिवासी स्त्रियांच्या राजकीय पटलांवरील सहभागाच्या एका ज्वलंत मुद्द्याला हात घातला. आजच्या काळात फोफावणाऱ्या स्वयंसेवी संस्था NGO यांची बनवेगिरी आणि लबाडी देखील कविता महाजन यांनी उघड करण्याचा प्रयत्न केला आहे. ठाण, रायगड भागामध्ये आदिवासींसाठी काम करणाऱ्या जागरूक आदिवासी संघटना किंवा प्रगत सुमेधच्या प्रगत सारख्या संस्था कशा प्रकारे आदिवासी भागामध्ये समाजकार्याच्या नावाने राज्य आणि केंद्र सरकार कडून कशाप्रकारे निधीची खैरात मिळवतात.परदेशी संस्थान कडून कशाप्रकारे कोट्यावधी निधीचा खोऱ्याने ओढतात आणि एकीकडे सातशे-आठशे रुपये पगारावर राबणारे कार्यकर्ते तर दुसरीकडे या स्वयंसेवी संस्थांचे संचालक देशविदेशात विमानाने प्रवास करतात आणि आदिवासी भागांमध्ये वातानुकूलित चेंबर मध्ये बसून लाखोरुपयांचे लॅपटॉप हाताळणारे संचालक अशा प्रकारच्या विरोधाभासावर देखील कविता महाजन यांनी प्रकाश टाकला आहे. स्वातंत्र्य मिळून 76 वर्षांचा कालखंड उलटला तरी देखील आजही देशातील बहुसंख्य आदिवासी जमाती या शेठ,

सावकार, मालगुजार, प्रशासकीय यंत्रणेतील नोकरशहा, अधिकारी कर्मचारी यांच्या शोषणात आजही गुरफटलेला दिसतो आहे हे सामाजिक वास्तव या कादंबरीतून देखील प्रकटले आहे सामाजिकतेच्या दृष्टीने ही एक अतिशय महत्त्वपूर्ण कादंबरी आहे

प्रतिष्ठा ही 2014 मध्ये प्रकाशित झालेली रामराजे आत्राम यांची एक महत्त्वाची कादंबरी आहेमराठवाड्यातील मादळमोह नावाच्या खेड्यातील जगन्नाथराव आणि जगदेवी या आदिवासी कुटुंबाची कथा या कादंबरीतून आत्राम यांनी मांडली आहेआज पर्यंतच्या आदिवासी कादंबऱ्यांपेक्षा ही कादंबरी साऱ्याच दृष्टीने वेगळी आहे मराठवाड्यात अभावानेच आढळणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे चित्र या कादंबरीत आले आहे. प्रतिष्ठा ही कादंबरी मादळमोहातील एका कष्टाळू आदिवासी कुटुंबाची जडणघडण आणि विघटनआणि सामाजिक प्रतिष्ठेपायी नाहक बळी जाणाऱ्या गजरा नावाच्यानायिकेची दुर्दैवी कहाणी आहे उदरनिर्वाहासाठी शेतजमीन नसणारे आदिवासी कुटुंब गावातील विविध शेतकऱ्यांच्या शेतांवर मोलमजुरी करून आपले आयुष्यव्यथित करत असतात. अतिशय कष्टाने जगन्नाथराव आणि जगदेवी आपल्या चारही मुलांची पालन पोषण करतात आणि त्यांची लग्न लावून त्यांना प्रपंचाला लावतात तर दुसरीकडेमादळमोह्यातील खानदानी मराठा कुटुंब असलेल्या तुका पाटलाच्या पाटील त्यांचे वारसदार असणारी त्याची तिन्ही मुले गावात प्रभाकर, सुधाकर, कमलाकर गावातील पाटीलकीची वहीवाट करतात गावचा कारभार प्रभाकर पाटील हाती घेतो, तर सर्वात लहान असल्यामुळे कमलाकर फारसे विशेष श्रम न करता सुद्धा भावांच्या सोबतीने सामूहिक मालमत्तेमध्ये असल्यामुळे आपले जीवन हेअशा आरामात सुखात लोळत रंगेलपणे जीवन व्यतीत करतो. पत्नी केतकी सोबत पटत नसल्याने कमलाकर पाटील दारूच्या आहारी जातो आणि दिवस रात्र तर दारूचे नशेतअसतो. तर दुसरीकडेउदरनिर्वाहासाठी जगन्नाथरावांची चारही मुले अहोरात्र कष्ट करताना दिसतात.

घरची परिस्थिती बेताची त्यातही भागवत सारखा आजारी नवरा आणि त्याचा औषध उपचाराचा हजार रुपयांचा खर्च या विवंचनेत पिचलेली पतीसोबत एकनिष्ठ असलेली, घरादाराची काळजी करणारी कष्टाळू मेहनती सुरुवातीला कमलाकर पाटलाच्या वासनेला भीक न घालणारी एक संयमित पतिव्रता,नायिका गजरारामराजे आत्राम यांनी साकारली आहे.साकारली आहे. माणुसकीच्या नात्याने कमलाकर पाटलांवर पट्टी बांधून उपचार करणारी कनवाळू मनाचीमाणुसकी जपणारी गजरासारखी नायिका कमलाकर पाटलाच्या वासनेला बळी पडते आणि पतीचा औषध उपचाराचा खर्च खर्चाच्या ओझ्याखाली दबल्यामुळे ती कमलाकर पाटलाचा प्रतिकार करत नाही. आणि कमलाकर पाटील देखील श्रेष्ठ कनिष्ठत्व सोडून केवळ आपली वासना भागवण्यासाठी गजरासारख्या अश्रापनायिकेचा उपभोग घेतो साधारणता पंधरा वर्षे गजराचे शोषण करतो आणि कादंबरीच्या शेवटी गावगाड्यात आपल्या कुटुंबाची बेअब्रू होत असताना, पाटलाच्या कुटुंबातील प्रभाकर पाटील सुधाकर पाटील त्यांच्या पत्नी चारुशीला आणि भैरवी गजरा आणि कमलाकर यांचे संबंध संपुष्टात आणू पाहतात. परंतु कमलाकर पाटलाच्या विरोधामुळे त्यांना ते शक्य होत नाही.शेवटी कुटुंबाची प्रतिष्ठा वाचवण्याच्या नादात ते गजरा सारख्या गरीब आदिवासी नायिकेचा खून घडवूनआणतात.गजरा बेपत्ता झाल्यामुळे गजराचा कुष्ठरोगीपती भागवत देखील आत्महत्या करून आपले जीवन यात्रा संपवतो. अशाप्रकारे पाटील घराणे आपली खोटी प्रतिष्ठा जपण्याच्या नादात दोन निरपराध जीवांचे बळी देतात.अशा प्रकारच्या एक धीर गंभीर सामाजिक आशयअसणारी प्रतिष्ठाही कादंबरी मराठी आदिवासी कादंबरीच्या प्रवाहात एक आगळावेगळा विषय घेऊन अवतरली आहे.

एकंदरीत आदिवासी कादंबऱ्याया आशयाच्या सामाजिकतेच्या दृष्टीने अतिशय वैविध्यपूर्ण आहे. बहुसंख्य कादंबरीकारांचा आदिवासी समाज जीवनाशी थेटपणे संबंध आलेला आहे त्यामुळेच त्यांना या समाज जीवनाशी त्यांच्या संस्कृतीशी काही प्रमाणात का होईना एक रूप होता आले आहे. त्याचा अभ्यास करता आला आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून सहाजिकच त्या समाज जीवनाचा

आशय प्रतिबिंबित होणे क्रमप्राप्तच होते म्हणून जवळपास मराठीआदिवासी कादंबरीच्या प्रवाहात ज्या ज्या कादंबरीकरांनी लेखन केले आहे. त्यांच्या लेखनातून आशयाची सामाजिक काही प्रकर्षाने आपणास जाणवते

**संदर्भ :**

१) जाधव रा.ग, 'साहित्य व सामाजिक संदर्भ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती, २००३, पृ. क्र.९०.

२) मुनघाटेगो.ना, 'माझी काटेमुंढरीची शाळा', साधना प्रकाशन पुणे, नववी आवृत्ती, २०१६पृ.क्र.५

३) दिघे र.वा, 'सोनकी', संस्कृती प्रकाशन, पुनरावृत्ती२०१४, पृ. क्र.१५२.

४) बर्वे अनिल,'डोंगर म्हातारा झाला' ऊर्जा प्रकाशन, तृतीया आवृत्ती, एप्रिल २०११, पृष्ठ क्रमांक५३.

५) मनोहर दिनानाथ, 'आंदोलन', ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, प्र. आ., १९८८, पृ. क्र.२२

६) मनोहर विलास, 'एका नक्षलवाद्याचा जन्म', श्री विद्या प्रकाशन पुणे, सहावी आवृत्ती, पृ. क्र.६.